# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**दूरध्वनी क्रमांक :**
(०२०) २५६२ ११८८
२५६२ ११५६
२५६२ ११५७
२५६२ ११६१

**शैक्षणिक विभाग**
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
टेलिग्राफ : युनिपुणे
फॅक्स : (०२०) २५६९ १२३३
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
इ–मेल : affiliation@pun.unipune.ac.in

**संदर्भ क्र.** : सीए/३१३

**दिनांक** : ०६ मे, २०२०

**<u>महत्त्वाचे</u>**

प्रति,
**मा. प्राचार्य/संचालक,**
अभियांत्रिकी, वास्तूशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र,
व्यवस्थापन शास्त्र, विधी आणि शिक्षणशास्त्र व
शारिरीक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांची
सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१८–२०१९ आणि २०१९–२०२० ची संलग्नता/ मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवण्याच्या/नूतनीकरणाच्या परवानगीच्या अटी व शर्तींच्या पूर्ततेचे अहवाल ऑनलाईन पध्दतीने सादर करणेबाबत......**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबत प्राप्त झालेल्या आदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, शासनाने 'कोरोना विषाणू (कोव्हिड–१९)' चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ हा दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू केलेला असून राज्यात संचारावर निर्बंध/बंदी घातली असल्याने तसेच शासनाकडून राज्यात 'टाळेबंदी (Lockdown)' लागू करण्यात आलेली असल्याने विद्यापीठाशी संलग्न/मान्यताप्राप्त अभियांत्रिकी, वास्तूशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन शास्त्र, विधी, शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांच्या सर्व संबंधित महाविद्यालयांची/परिसंस्थांची **शैक्षणिक वर्ष २०१८–२०१९ आणि २०१९–२०२० ची संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवण्याच्या/नूतनीकरणाच्या परवानगीच्या अटी व शर्तींच्या पूर्तता अहवालांची तपासणी/पडताळणी** ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहे.

तरी उपरोक्तकामी वरील अभ्यासक्रमांच्या सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालयांनी/ मान्यताप्राप्त परिसंस्थांनी त्यांच्या **Puncode/Unipune ID** वरून पुढील कागदपत्रं व माहिती ही विद्यापीठाच्या **www.unipune.ac.in** या संकेतस्थळावरील **BOD - BOD Online – Login – For College User - Online Compliance Reports of continuation of affiliation/recognition/natural growth** या लिंकवर प्राधान्याने **Upload** करावी.

**१. शैक्षणिक वर्ष २०१८–२०१९ आणि २०१९–२०२० ची संलग्नता/मान्यता/ नैसर्गिक वाढ चालू ठेवण्याच्या/नूतनीकरणाच्या परवानगीचे पत्र.**

**२. शैक्षणिक वर्ष २०१८—२०१९ आणि २०१९—२०२० ची संलग्नता/मान्यता/ नैसर्गिक वाढ चालू ठेवण्याच्या/नूतनीकरणाच्या अटी व शर्तींच्या पूर्ततेबाबतचा क्रमवार कागदपत्रांसहितचा शैक्षणिक वर्षनिहाय अहवाल.**
**(सोबत अहवालाचा नमुना)**

**३. उपरोक्त बाबींची संपूर्ण माहिती असलेल्या महाविद्यालय/परिसंस्था प्रतिनिधीचे नाव, भ्रमणध्वनी आणि इ—मेल आय.डी.**

ज्या महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी उपरोक्त अहवाल अनुषंगिक कागदपत्रांसह यापूर्वी ऑफलाईन पध्दतीने सादर केलेले आहेत त्या महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी देखील सदरहू अहवाल सोबत जोडलेल्या नमुन्यात अथवा ऑफलाईन पध्दतीने यापूर्वी सादर केलेल्या उपरोक्त अहवालाच्या व त्यासोबतच्या कागदपत्रांच्या प्रती वरीलप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

कळावे,

आपली,

**सहायक कुलसचिव**
**(संलग्नता कक्ष)**

**सोबत :** वरीलप्रमाणे.

# <u>अहवालाचा नमुना</u>

## शैक्षणिक वर्ष २०१८—२०१९/२०१९—२०२० ची संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवण्याच्या/नूतनीकरणाच्या परवानगीतील अटी व शर्तीच्या पूर्ततेबाबतचा अहवाल

**महाविद्यालयाचे/परिसंस्थेचे व्यवस्थापन करणाऱ्या संस्थेचे नांव व पत्ता :**

**महाविद्यालयाचे/परिसंस्थेचे नांव व पत्ता :**

**शैक्षणिक वर्ष २०१८—२०१९/२०१९—२०२० ची संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवण्याच्या/ नूतनीकरणाच्या विद्यापीठाच्या परवानगी पत्रांचा तपशील :**

**संदर्भ क्र. :** सीए/
**दिनांक :**

| अ. क्र. | अटी व शर्तीचा तपशील | पूर्ततेचा तपशील (होय/नाही.) | अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या कागदपत्रांचा/ अटी व शर्तीच्या पूर्ततेसंदर्भात केलेल्या कार्यवाहीच्या कागदपत्रांचा तपशील/ | पान क्र. | | अटी व शर्तीची पूर्तता अथवा त्यासंदर्भात कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याबाबतच्या कारणांचा तपशील (लागू असल्यास) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत | |
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |

**स्वाक्षरी**
**अध्यक्ष/सचिव**
**(संस्थेचे नाव व पत्ता)**
**संस्थेचा शिक्का**

**स्वाक्षरी**
**प्राचार्य/संचालक**
**(महाविद्यालयाचे/परिसंस्थेचे नाव व पत्ता)**
**महाविद्यालयाचा/परिसंस्थेचा शिक्का**

(**टिप :** शैक्षणिक वर्ष २०१८—२०१९ व शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० ची संलग्नता/मान्यता/ नैसर्गिक वाढ चालू ठेवण्याच्या/नूतनीकरणाच्या विद्यापीठ परवानगीचे पत्र संबंधित अटी व शर्तीच्या तपशीलासह तसेच उपरोक्त अहवाल अनुषंगिक कागदपत्रांसह त्या त्या शैक्षणिक वर्षाच्या संबंधित लिंकवर स्वतंत्रपणे Upload करावा.)